# इये वेदांताचिये नगरी

श्री. चंद्रशेखर मुद्‌गल

### महाशिवरात्र

माघ कृष्ण चतुर्दशी म्हणजे महाशिवरात्र! बुधवार दिनांक २ मार्च २०११ रोजी देवस्थानात महाशिवरात्र साजरी झाली. महाशिवरात्रीला सायंकाळी चंद्रमौलेश्वरावर १०८ लिटर इक्षुरसाचा रुद्राभिषेक करण्यात आला. अभिषेकानंतर नित्याची सायंकालीन आरती संपन्न झाली. आरतीनंतर उपस्थित सर्व भक्तांना उसाच्या रसाचा प्रसाद देण्यात आला. रात्री ८ वाजता 'चारयाम' पूजेस प्रारंभ झाला. रात्री ८ ते पहाटे ५ पर्यंत चंद्रमौलेश्वरावर पाण्याच्या संतत धारेने रुद्राभिषेक होऊन षोडशोपचारे पूजा करण्यात आली. रुद्रावर्तन पठणामध्ये गुरुजींबरोबर पाठशाळेतील विद्यार्थी देखील सहभागी झाले होते.

### सद्‌गुरु श्री रामकृष्ण स्वामी जयंती

फाल्गुन शुद्ध तृतीया म्हणजे सद्‌गुरूंचा वर्धापन दिन! मंगळवार दिनांक ८ मार्च २०११ रोजी देवस्थानात प. पू. सद्‌गुरूंची ७७ वी जयंती साजरी करण्यात आली. या जयंती उत्सवाच्या अंतर्गत यज्ञ, वैदिक अनुष्ठान, पाद्यपूजा, अनुभव कथन, गायनसेवा व पालखी सोहळा इत्यादी कार्यक्रमांचा समावेश असतो. प. पू. सद्‌गुरूंच्या जयंती निमित्ताने दिनांक ५ मार्च ते ८ मार्च २०११ पर्यंत पंचायतन यागाचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक ८ मार्च २०११ रोजी सकाळी ९ वाजता पंचायतन यागाची पूर्णाहुती झाली.

पहाटे ५ वाजता श्री दत्तक्षेत्र गर्भगृहात मंगलपूजेस प्रारंभ झाला. भगवान श्री दत्तात्रेयांची यावेळी १०८ लिटर दुधाच्या अभिषेकाने महापूजा करण्यात आली. यावेळी पवमान सूक्ताचे, रुद्राचे पठण करण्यात आले. महापूजेनंतर प. पू. सद्‌गुरूंच्या सुवर्ण पादुकांवर रुद्राभिषेक होऊन षोडशोपचारे पूजन करण्यात आले. पूजनानंतर सुवर्णपादुका सर्व गुरुभक्तांना दर्शन मिळावे यासाठी अधिष्ठान मंडपात आसनासमोर ठेवण्यात आल्या. सकाळी ८ वाजता देवस्थानची नवीन प्रकाशने (गुरुवाणी पुष्प १६, इंग्रजी गुरुवाणी पुष्प २ व नारद भक्तिसूत्रे) सद्‌गुरुचरणांवर अर्पण करून त्यांचे प्रकाशन करण्यात आले.

भक्तांना दर्शन घेणे सुलभ व्हावे व लवकर व्हावे म्हणून रांगेची वेगळी व्यवस्था करण्यात आली होती. श्री दत्तक्षेत्र प्रांगणात सामानाचा स्टँड, चप्पल स्टँड, मुख्य मंडप, विक्री केंद्रे तसेच रांगेसाठी बॅरिकेडिंग अशा स्वरूपाची व्यवस्था केली होती. मुख्य मंडपात सकाळी ठीक ९.३० वाजता प. पू. सद्‌गुरूंच्या प्रतिमेचे आगमन झाले. यावेळी पाठशाळेतील विद्यार्थ्यांनी बिरुदावलीने सद्‌गुरूंना वंदन केले. मंडपातील मंचावर प. पू. सद्‌गुरूंचे आसन व आसनावर प्रसन्न मुद्रेतील प्रतिमा विराजित केली होती. या पार्श्वभूमीवर अधिष्ठानाच्या पाठीमागे आकर्षक व विविधरंगी सुवासिक फुलांची आरास करण्यात आली होती.

उत्सव समितीप्रमुख श्री. सुरेश गांधी यांनी प. पू. सद्‌गुरूंना साष्टांग दंडवत घालून प्रास्ताविकाने कार्यक्रमाची सुरुवात केली. सर्व सत्संग मंडळांच्या वतीने कोल्हापूर व राहुरीगाव सत्संग मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी सर्व भक्तांतर्फे सद्‌गुरूंची पाद्यपूजा केली. वेदमूर्ती श्री. नवाथे गुरुजींच्या पौरोहित्याखाली वेदमंत्रांसह पूजा संपन्न झाली.

पाद्यपूजेनंतर सर्व विश्वस्तांनी व सत्संग मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी पादुकांना वंदन करून आपापल्या सत्संग मंडळाच्या वतीने सेवा अर्पण केली. यानंतर विश्वस्त श्री. श्रीरंग जेस्ते (डोंबिवली), व श्री. श्रीकांत मोडक (डोंबिवली) या भक्तांनी आपले मनोगत व्यक्त करताना सद्‌गुरु महिमा कथन केला. अनुभवकथनाच्या कार्यक्रमानंतर उपस्थित गुरुभक्तांनी प. पू. सद्‌गुरूंच्या आशीर्वादाच्या ध्वनिफीतीचे श्रवण केले. त्यानंतर नारद भक्तिसूत्रे या पुस्तकाच्या लेखिका प्रतिमा गद्रे यांचा देवस्थानतर्फे शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर प. पू. सद्‌गुरूंना सुवासिनींनी ७७

दिव्यांनी ओवाळले आणि सर्व भक्तांनी सद्गुरूंची आरती केली. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. नित्याची माध्यान्ह आरती ११.५५ वाजता सुरू झाली. त्यानंतर उपस्थित ५ ते ६ हजार भक्तांनी प्रसादभोजनाचा लाभ घेतला.

दुपारच्या सत्रात दुपारी ३ ते ४ या वेळेत सामुदायिक श्रीरामराय माहात्म्य पठणाचा कार्यक्रम संपन्न झाला. त्यानंतर नित्य सेवा करणाऱ्या भक्तांचा देवस्थानतर्फे सत्कार करण्यात आला. श्री दत्तात्रेय मंदिरासमोर दररोज रांगोळी काढण्यात येते आणि सकाळी १० ।। वाजता विष्णुसहस्रनामाचे पठण करण्यात येते. तसेच अधिष्ठानात प. पू. गुरुदेवांसमोर दर एकादशीला गायनसेवा केली जाते. या सर्व स्त्री-पुरुष भक्तांना देवस्थानतर्फे 'सानुवाद श्रीविष्णुसहस्रनाम' पुस्तक प्रसाद म्हणून देण्यात आले.

दुपारी ४ वाजता श्री दत्तात्रेय सत्संग मंडळ धुळे-जळगावच्या सभासदांनी फारच सुंदर भक्तिगीतसेवा केली. सुमारे २ तास चाललेल्या या गायनसेवेच्या श्रवणाचा लाभ घेण्यात श्रोते रंगून गेले होते. सौ. उपासनी (जळगाव) यांनी सूत्रसंचालन केले. ही संगीत सेवा सादर करणाऱ्या गुरुभक्तांचा देवस्थानतर्फे सत्कार करण्यात आला. यानंतर दुपारच्या सत्रातील कार्यक्रमाची सांगता झाली.

सायंकाळी नित्याची आरती ७.३० वाजता पूर्ण होऊन पालखी सोहळ्यास प्रारंभ झाला. भक्तांना परमोच्च आनंद देणारा कार्यक्रम म्हणजेच पालखी!

प. पू. सद्गुरूंच्या प्रतिमेचे पालखीमध्ये आगमन होऊन पालखी प्रदक्षिणेस सुरुवात झाली. 'धन्य धन्य हो प्रदक्षिणा....' म्हणून पहिले गानपुष्प सद्गुरुचरणी अर्पण करण्यात आले. पालखीने मंदिराभोवती तीन प्रदक्षिणा केल्या. प्रत्येक प्रदक्षिणेला चार थांब्यावर भक्तांनी गायन वादन सेवा अर्पण केली. प्रत्येक प्रदक्षिणेत वेदांत विद्यापीठातील विद्यार्थी व अध्यापक गुरुजींनी वेदपठण करून वेदसेवा सादर केली. पालखीमध्ये ज्यांनी गायनसेवा केली त्या भक्तांचा देवस्थानतर्फे श्रीफळ प्रसाद देऊन सत्कार करण्यात आला.

मंदिरावर सोडलेल्या प्रकाशझोतांमुळे मंदिराचे सौंदर्य खुलून दिसत होते. यासोबत फटाक्यांच्या आतषबाजीमुळे पालखी सोहळ्याची रंगत अधिकच वाढली. अतिशय जड अंत:करणाने सोहळ्याच्या आठवणी मनात साठवत भक्तांनी देवस्थानचा निरोप घेतला.

## गुढीपाडवा

नूतन संवत्सराचे स्वागत गुढी उभारून करण्याची धार्मिक परंपरा आपल्याकडे आहे. खर नाम संवत्सराच्या प्रथमदिनी म्हणजेच चैत्र शुद्ध प्रतिपदा, दिनांक ४ एप्रिल २०११ रोजी देवस्थानात मंदिराच्या अंतर्गत भागात ईशान्य कोपऱ्यात गुढी उभारण्यात येऊन गुढीचे पूजन करण्यात आले. देवस्थानातील सर्व वास्तूंवर नवीन ध्वज लावण्यात आले.

## श्रीराम जन्मोत्सव

स्थानिक पातळीवर साजरा होणारा श्रीराम नवमीचा कार्यक्रम मंगळवार दिनांक १२ एप्रिल २०११ रोजी श्रीदत्तक्षेत्रात प्रसन्न वातावरणात पार पडला. पहाटे श्रीरामचंद्रांच्या मूर्तीवर पवमान अभिषेक करून षोडशोपचारे पूजा झाली. वस्त्रालंकारांनी नटवलेले श्रीराम पंचायतन गर्भगृहात भक्तांच्या दर्शनासाठी मांडण्यात आले होते. सकाळी ८ वाजता गर्भगृहासमोरील मंडपात नगर महिला व पुरुष सत्संगातर्फे सामूहिक रामरक्षा पठण करण्यात आले. रामरक्षा पठणानंतर नगर महिला सत्संगातर्फे भजनसेवा सादर करण्यात आली. 'श्रीरामाष्टक' ने भजनसेवेस प्रारंभ झाला.

या सेवेमध्ये श्री समर्थ रामदास स्वामींनी रचलेल्या अनेक भजनांबरोबर 'आदौ रामतपोवनाभिगमनं..' यासारख्या संस्कृत भजनाचा समावेश होता.

सकाळी ११.२० ला माध्यान्हपूजेस प्रारंभ झाला. वेदपाठेशाळेतील विद्यार्थी व अध्यापकांनी वेदपठण केले. दुपारी १२ वाजता जन्म होऊन 'बाळा जो जो रे, कुलभूषणा, दशरथनंदना...' हा पाळणा म्हणण्यात आला. 'प्रभु श्रीरामचंद्र की जय' या घोषात कार्यक्रमाची सांगता झाली. सर्व भक्तांना पंजिरी (सुंठवडा) व कलिंगड प्रसादाचे वाटप करण्यात आले.

## श्री हनुमान जयंती

चैत्र पौर्णिमा दिनांक १८ एप्रिल २०११ रोजी तपोवनात हनुमान जयंती साजरी करण्यात आली. विजय मारुतीच्या मंदिरावर विद्युत रोषणाई करण्यात आली होती. गर्भगृह व मंदिर विविधरंगी, आकर्षक माळांनी व तोरणांनी सजवण्यात आले होते. तपोवन परिसर पताकांनी सुशोभित करण्यात आला होता. त्या दिवशी ब्राह्म मुहूर्तावर षोडशोपचार पूजा व रुद्राभिषेक होऊन श्री हनुमान जयंती साजरी झाली. सूर्योदयाला आरती झाल्यावर श्रीरामरक्षा व मारुती स्तोत्राचे पठण करण्यात आले. श्री मारुतीरायांच्या जयजयकाराच्या घोषणांनी तपोवन दणाणून गेले होते.